21-22 (81)

One Day National E-Conference

On

# "Corporate Social Responsibility : In India Amid Covid-19 Pandemic"

in collaboration with Departments of Commerce of

Dr. M. K. Umathe College . Nagpur

Annasaheb Gundewar College , Nagpur

Mahatma Gandhi Arts and Commerce College. Parseoni

Kewalramji Harde Mahvidyalay, Chamorshi

# CERTIFICATE OF PARTICIPATION

This is to certify that प्रा. नरेश दामाजी सोनटक्के of म. वि. प्र. समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर has attended One Day National E-Conference titled Corporate Social Responsibility : In India Amid Covid-19 Pandemic organized on 8th October 2021. He/She also published a research paper entitled संशोधन लेख शीर्षक: व्यावसायिक सामाजिक जबाबदारी

| Dr. D. V. Naik<br>Principal<br>Dr. M.K. Umathe College. Nagpur | Dr. Gajanan Patil<br>Principal<br>Annasaheb Gundewar College. Nagpur | Dr. L. B. Jadhav<br>Principal<br>Mahatma Gandhi Arts and Commerce College. Parseoni | Dr. H. P. Banpurkar<br>Principal<br>Kewalramji Harde Mahavidyalay Chamorshi |
|---|---|---|---|

Scanned with CamScanner

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# व्यावसायिक सामाजिक जबाबदारी
## (Corporate Social Responsibility)

**प्रा. नरेश दामाजी सोनटक्के**
*(सहयोगी प्राध्यापक आणि वाणिज्य विभाग प्रमुख)*
*म. वि. प्र. समाजाचे, गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर, जि. नाशिक.*

**प्रस्तावना:**

व्यवसायाचा मूळ उद्देश हा नफा मिळविणे असतो. हाच उद्देश अनेक वर्षापासून व्यावसायिकांचा राहिला. परंतु ज्या ग्राहकांच्या, कर्मचार्यांच्या आणि समाजाच्या जोरावर व्यावसायिक व्यापार व व्यासाय करतो त्यांचा विचार मात्र फारसा ते करतांना दिसत नाही. त्यामुळे वरील वर्गाच्या बाबतीत आपली काही जबाबदारी आहे याचा विसर त्याला पडतो. म्हणजेच तो आपली सामाजिक बांधिलकी विसरून फक्त भरमसाठ नफा मिळवून आणखी श्रीमंत होतो. हा जो नफा आपल्याला मिळाला आहे तो वरील सर्व घटकांच्या मदतीने आणि प्रतिसादामुळे मिळाला याचाही त्याला विसर पडतो. त्यामुळे हा नफा मिळवितांना सामाजिक बांधिलकी प्रत्येक व्यवसायाने जोपासणे अत्यंत आवश्यक आहे कारण व्यावसायिक, जो नफा मिळवितो तो नफा समाजापासून मिळवित असतो. व्यवसाय जे काही उत्पादन करीत असते किंवा सेवा निर्मीती करीत असते ते उत्पादन किंवा सेवा ते ग्राहकांना म्हणजेच पर्यायाने समाजाला पुरवीत असतात आणि त्यापासून आपल्या व्यवसायासाठी नफा मिळवून व्यवसायाचा विकास करित असते. त्यामुळे व्यवसायाची ही एक सामाजिक जबाबदारी आहे की त्यांनी मिळालेल्या नफ्यातून काही भाग हा समाजासाठी खर्ची पाडावा. त्यासाठी व्यवसायाने सामाजिक बांधिलकी जोपासावी अशी एक विचारधारा निर्माण झाली.

त्याच अनुषंगाने कंपनी कायदा २०१३, च्या विभाग १३५ आणि अनुसूची क्रमांक VII मध्ये बदल करून विशिष्ट पात्रता धारण करणाऱ्या कंपन्यांनी व्यवसाय करताना समाजाचा आपण एक घटक आहोत आणि त्यामुळे आपली समाजाच्या प्रति जबाबदारी आहे हे लक्षात घेऊन समाजाच्या कल्याणासाठी काम करणे आवश्यक आहे ही मानसिकता तयार करण्यासाठी वरील कायद्यामध्ये सुधारणा केली गेली आणि या सुधारणे नुसार प्रत्येक पात्रताधारक व्यवसायाने समाजाच्या कल्याणासाठी काही कार्य करणे आवश्यक आहे. ही कार्ये आणि बांधिलकी म्हणजेच व्यावसायिक सामाजिक जबाबदारी होय. याचाच अर्थ असा की, व्यवसायाने आपला व्यवसाय करतांना आपण समाजाचे काही देणे लागतो ते आपण पूर्ण करणे आवश्यक आहे यासाठी जे प्रयत्न केले जातात त्यालाच कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी असे म्हणता येईल. यालाच संक्षिप्त स्वरूपात CSR असेही म्हटले जाते. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीमुळे समाजातील दुर्लक्षित, वंचित घटकापर्यंत पोहोचणे शक्य होते.

**प्रमुख शब्द (Key Words):**
सीएसआर, व्यावसायिक सामाजिक जबाबदारी, व्यवसाय, कॉर्पोरेट, व्यावसायिक ई.

**संशोधन लेखाचे उद्देश:**

प्रस्तुत संशोधन लेखाचे खालील प्रमाणे मुख्य उद्देश आहेत.

1. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीचा अर्थ समजून घेणे.
2. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीच्या कायदेशीर तरतूदी आणि व्याप्तींचा अभ्यास करणे.
3. व्यावसायिक सामाजिक जबाबदारी चे फायदे आणि महत्व पटवून देणे.

**संशोधन लेखाचे गृहितके:**

सदर संशोधन लेखन करतांना काही बाबी या गृहीत धरलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे.-

1. व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) ही संकल्पना अधिक व्यापक आहे.
2. व्यावसायिक सामाजिक जबाबदारी हे धोरण वर्तमान काळात अधिक आवश्यक आहे.
3. सीएसआर धोरणामुळे देशाचा, समाजाचा, नोकरदार मंडळींचा, ग्राहकांचा म्हणजेच देशाचा सर्वांगीण विकास होण्यास अधिक मदत होते.

**संशोधन लेखाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन लेखाच्या व्याप्ती व मर्यादांचा विचार करता असे म्हणता येईल की, या लेखात फक्त कॉर्पोरेट सामाजिक



Scanned with CamScanner

जबाबदारी बाबत चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये कॉर्पोरेट सामाजिक जबावदारीचा अर्थ, कायदेशीर तरतूदी आणि व्याप्ती तशेच व्यावसायिक सामाजिक जबाबदारीचे फायदे आणि महत्व स्पष्ट केलेले आहे.

**संशोधन लेखन पद्धती आणि माहिती संग्रहण पद्धत:**

सदर संशोधन लेखनात संशोधन आराखड्याचा वापर केला आहे. संशोधन आराखडा हा एक संशोधनाचा पद्धतशीर मार्ग आहे ज्याद्वारे संशोधन अधिक योग्य पद्धतीने करता येते. प्रस्तुत संशोधन लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधन लेखन हे दुय्यम स्वरूपाच्या माहितीच्या आधारे म्हणजेच ईतर पक्षांनी गोळा केलेल्या माहितीच्या आधारे जी वेबसाईट, क्रमिक पुस्तके इ. द्वारे तयार केलेले आहे.

**व्यावसायिक सामाजिक जबाबदारी: अर्थ व व्याख्या-**

**अर्थ:**

व्यवसायाने व्यवसायाच्या विकासासाठी सामाजिक भान ठेवून समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणे म्हणजेच सामाजिक जबाबदारी होय. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास व्यवसायाने व्यवसायाच्या विकासासोबतच समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणे म्हणजेच व्यवसायाची सामाजिक जबाबदारी पूर्ण करणे होय. आपण म्हणजेच व्यवसाय हा एक समाजाचाच घटक आहे त्यामुळे समाजाप्रती आपली काही जबाबदारी आहे ती पूर्ण करणे हे आपले कर्तव्य आहे याचे भान ठेवून समाजासाठी कार्य करणे म्हणजे व्यावसाथीक सामाजिक जबाबदारी पूर्ण करणे होय.

**व्याख्या:**

१) **मॅकगायर :** "सामाजिक जबाबदारीमध्ये व्यवसाय किंवा उद्योग संस्थांद्वारे केवळ आर्थिक आणि कायदेशीर कर्तव्यें यांचाच समावेश होत नाही तर या जबाबदाऱ्या खेरीज समाजातील इतर महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्नही केला जातो."

२) **बिजनेस डिक्शनरी:** "उद्योग समूहांनी आपला उद्योग, कोणत्याही कायद्याच्या वा मार्गदर्शक तत्वांच्या पलीकडे जाऊन आर्थिक, सामाजिक तथा पर्यावरणीय धारणाक्षम पद्धतीने व स्वेच्छेने चालविण्याचे धोरण होय."

**व्यावसायिक सामाजिक जबाबदारी - कायदेशीर तरतूद आणि व्याप्ती:**

कंपनी कायदा २०१३ च्या, विभाग १३५ आणि अनुसूची क्रमांक VII मधील बदलांनुसार, एप्रिल २०१४ मध्ये कार्पोरेट सामाजिक जबाबदारी ही उद्योग-व्यवसाय संस्थांकरिता अनिवार्य केली आहे. त्यानुसार ज्या कंपन्यांची वार्षिक उलाढाल एक हजार कोटी रुपये अथवा अधिक आहे किंवा निव्वळ नफा ₹ ५ कोटी अथवा त्यापेक्षा अधिक आहे किंवा कंपनीची एकूण नेटवर्थ किंवा निव्वळ संपत्ती ₹ ५०० कोटी अथवा अधिक आहे अशा सर्व कंपन्यांनी मागील तीन वर्षांच्या एकूण सरासरी नफ्याच्या २% राशी ही भारतातील समाज कार्यासाठी वापरणे बंधनकारक केलेले आहे. अश्या पद्धतीने सी. एस. आर. (CSR) म्हणजेच "व्यावसायिक सामाजिक जबाबदारी" हा उपक्रम उद्योगांच्या कार्यपद्धतीचा एक महत्वाचा अविभाज्य घटक बनला आहे आणि त्यानुसार अनेक महत्त्वाचे सामाजिक प्रश्न या उपक्रमाद्वारे चर्चेला येऊ लागले आणि ते प्रश्न सोडविण्याचा ही प्रयत्न याच उपक्रमाद्वारे होऊ लागले. शिवाय कंपनी संचालक मंडळाने आपला सी. एस. आर. धोरण आदेश लागू करण्यासाठी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी समिती स्थापन करणे आवश्यक आहे. त्या समितीमध्ये किमान तीन संचालक असायला पाहिजे किंवा अधिक संचालकांचा समावेश सुद्धा करता येते. तशेच त्याबाबत विस्तृत धोरण आखून त्याबाबत आवश्यक ती सर्व माहिती संबंधित विभागाला देणे आवश्यक आहे. शिवाय यासाठी तयार केलेल्या निधीचा वापर कशापद्धतीने केलेला आहे याबद्दलचा सविस्तर अहवाल देणे अनिवार्य केलेले आहे. जर एखाद्या व्यवसायाने नियमांचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कोणती कायदेशीर कारवाई केली जाईल याचा स्पष्ट उल्लेख नसला तरी आर्थिक दंड मात्र केला जाऊ शकतो असे नमूद करण्यात आलेले आहे.

कार्पोरेट सामाजिक जबाबदारी या उपक्रमाअंतर्गत कोणकोणत्या बाबींचा समावेश होऊ शकतो याची मर्यादा कायद्यामध्ये स्पष्टपणे दिलेली नाही. हे जरी खरे असले तरीही अनेक अंतर्गत तशेच बहिर्गत आणि सामाजिक बाबींचा समावेश यामध्ये होतो. असे कोणतेही उपक्रम या प्रकल्पा अंतर्गत घेतले जाऊ शकतात, ज्यामुळे समाजाची, पर्यावरणाची निगा राखल्या जाईल, देशाचे कल्याण होईल, व्यावसायिक विकास होईल तसेच सामाजिक विकास होईल असे कोणतेही उपक्रम या सी. एस. आर. नुसार घेतले जाऊ शकतात. काही उपक्रम खालीलप्रमाणे असू शकतात.

१) देशातील दारिद्र्य निवारण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे.



Scanned with CamScanner

जाहिरात होत असते. त्यासाठी वेगळ्या पद्धतीने जाहिरात करण्याची गरज नसल्याने वेगळा खर्चही करावा लागत नाही. त्यामुळे व्यवसायाला आर्थिक झळ पोहचत नाही व त्यासाठी वेगळा जाहिरात निधी निर्माण करण्याचीही गरज राहत नाही. सीएसआर हा स्वतःच एक जाहिरात मार्ग ठरतो.

**६) व्यावसायिक व अंतर्गत सहसंबंध अधिक सुदृढ:** व्यावसायिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत व्यवसायात अधिक शांतता प्रस्थापित केली जाते. कर्मचार्यांच्या सोयी-सुविधांचा विचार व्यवसाय करीत असतो. त्यामुळे कर्मचारी समाधानी असतात. त्याचाच परिणाम व्यवसायात अंतर्गत कलह निर्माण होत नाही. भागधारक समाधानी असतात कारण त्यांना गुंतवणुकीवर योग्य मोबदला मिळतो. त्यामुळे आपोआपच सहसंबंध सुदृढ होण्यास मदत होते.

**७) पर्यावरणपूरक उपक्रमास मदत:** सीएसआर अंतर्गत अनेक पर्यावरणीय उपक्रम राबविले जातात. जसे - वृक्ष लागवड करणे, झोपडपट्टी विकास उपक्रम, ग्रामविकास प्रकल्प, पेयजल, सौर ऊर्जा ई. मुळे पर्यावरणाला अनुकूल असे वातावरण तयार करणे सहज शक्य होते.

**८) शासन स्तरावर मदत:** सीएसआर अंतर्गत अनेक उपक्रम शासनाऐवजी व्यावसायिक पार पाडीत असतात. जसे - ग्राम विकास योजना, पेयजल योजना, वृक्षारोपण कार्यक्रम, हॉस्पिटल उभारणी ई. यामुळे या योजनांवर शासनाला खर्च करण्याची गरज नसते किंवा कमी खर्च करावा लागतो. त्यामुळे शासनास मदतच होत असते.

**९) कायद्याचे योग्य पालन केले जाते:** सीएसआर धोरण स्वीकारणाऱ्या व्यवसायांना विविध कायद्याचे पालन करावे लागते. कायद्यानुसार आपला व्यवसाय चालवावा लागतो. म्हणजेच ते नितीमुल्याची जोपासना करून व्यवसाय चालवितात. म्हणजेच ते कुठल्याही वाममार्गाचा अवलंब करीत नाही असे समजले जाते. त्यामुळे व्यावसायिक प्रतिष्ठा प्राप्त होते.

**१०) नफ्यात वाढ:** सीएसआर धोरणामुळे ग्राहक समाधानी असतो. त्यामुळे वस्तूची मागणी वाढून विक्रीही वाढते. कर्मचारी समाधानी असतो त्यामुळे कोणतेही औद्योगिक कलह निर्माण होत नाही. त्याचाच परिणाम उत्पादन क्षमता वाढते. वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे प्रतिष्ठा वाढते. जाहिरात खर्च कमी करावा लागतो. गुंतवणूक वाढविण्यास मदत होते. या सर्वांचा परिणाम व्यवसायाचा नफा मोठ्या प्रमाणात वाढतो.

**निष्कर्ष:**

वरील सर्व बाबींचा विचार केल्यास असा निष्कर्ष काढण्यात आला की,

व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) म्हणजे कंपनीचा किंवा व्यवसायाचा असा एक उपक्रम आहे, जो सामाजिक भावनेतून केला जातो. आपण समाजाचा एक अविभाज्य घटक आहोत त्यामुळे आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून देशासाठी, समाजासाठी, पर्यावरणासाठी, सांस्कृतिक विकासासाठी वेगवेगळ्या मार्गाने मदत करणे हे व्यावसायिक सामाजिक जबाबदारीमध्ये अभिप्रेत आहे असे दिसून येते.

भारतीय प्रमंडळ कायदा, १९५६ मध्ये सीएसआर धोरण ऐच्छिक स्वरूपाचे होते. त्यामुळे व्यावसायिक या बाबींकडे दुर्लक्ष करीत होते. पण आज भारतात, कंपनी कायदा, २०१३ मधील तरतुदीनुसार पात्रता धारक कंपन्यांनी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी पूर्ण करणे बंधनकारक केलेले आहे. त्यानुसार संबंधित व्यवसायांना वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळे उपक्रम राबवून आपली जबाबदारी पार पाडावी लागेल.

सीएसआरमुळे देशाला फायदा होतोच शिवाय संबंधित व्यवसायाला सुद्धा अनेक पद्धतीने फायदा होत आहे. सीएसआर मुळे समाजाचा विकास होण्यास मदत होते. पर्यायाने देशाचा विकास होतो. अनेक बाबींवर शासनाचा खर्च कमी होतो. तर संबंधित व्यवसायाची प्रतिष्ठा वाढते. जाहिरात खर्च कमी होतो. औद्योगिक कलह कमी होतो, कर्मचारी समाधानी असतात पर्यायाने त्या व्यवसायाचा नफा वाढून त्याचा विकासही होतो.

**संदर्भ:**

1. व्यवसाय प्रशासन - III, एम.कॉम. - I (Sem. II), Success Publication
2. loksatta.com/career-vrutantta/Corporate - Social - Responsibility- 2
3. alotmarathi.com/ सी - एस – आर
4. व्यावसायिक निती आणि व्यावहारिक मूल्ये - एम. कॉम. भाग - १, निराली प्रकाशन



Scanned with CamScanner

२) लिंगभाव विषयक समानता प्रस्थापित करण्यासाठी उपक्रम राबविणे.

३) निराधार मुलां-मुलींना कपडे/वस्त्र पुरविणे आणि त्यासाठी योजना आखणे.

४) ग्रामीण भागात शाळा, रुग्णालय बांधणे,पेयजल व्यवस्था करणे, सौर ऊर्जा प्रकल्प उभारून गाव स्वयंपूर्ण बनविणे.

५) एखादे खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास करणे.

६) समाजाचे आरोग्य सुधारणेसाठी उपक्रम राबविणे.

७) महिला सबलीकरण, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाची उन्नती ई.साठी उपक्रम राबविणे.

८) वृक्ष लागवड करणे , सृष्टीचा समतोल साधण्यासाठी उपक्रम राबविणे, नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे, वन्यजीव संवर्धन ई. द्वारे पर्यावरणाचे संरक्षण करणे.

९) ग्रामीण खेळ, ऑलिंपिक खेळ ई. ना प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक तरतूद करून त्याचा योग्य वापर करणे.

१०) शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य यांचा प्रचार व प्रसार करणे.

११) झोपडपट्टी पुनर्वसन आणि विकास प्रकल्प राबविणे.

१२) ग्रामविकास प्रकल्प उभारणे.

१३) वृद्धाश्रम, अनाथालय उभारणे व त्यांचे संचालन करणे.

१४) शेती व्यवसाय अधिक बळकट होईल त्यासाठी प्रयत्न करणे. (जसे - सेंद्रिय कृषी कार्यक्रम ई.)

१५) आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे व त्यासाठी दवाखाने आणि हॉस्पिटल उभारणे.

१६) आपत्ती निवारण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

१७) अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय यांच्या सामाजिक, आर्थिक आणि कल्याणासाठी केंद्र सरकारने स्थापित केलेल्या कोणत्याही निधीला देणगी देणे.

१८) प्रधानमंत्री राष्ट्रीय सहाय्यता निधीला देणगी देणे.

१९) मानव संसाधन विकासास हातभार लावणे.

२०) समाजाभिमुख उत्पादन साखळी तयार करणे. (जसे - उपयोगिता, सुरक्षा, सत्यता, समाधान ई.)

**व्यावसायिक सामाजिक जबाबदारी - फायदे व महत्व:**

कार्पोरेट/व्यावसायिक सामाजिक दायित्व ही आजच्या आधुनिक काळात अत्यंत आवश्यक अशी बाब आहे. त्यामुळे व्यवसायाला सामाजिक जाण राहते आणि आपण समाजाचे काही देणे लागतो ही भावनाही निर्माण होते. मात्र यासाठी व्यवसायाला आपल्या नफ्यातून काही वाटा बाजूला काढून ठेवावा लागतो जो सामाजिक, सांस्कृतिक, कर्मचारी वर्ग आणि पर्यावरण उत्थाणासाठी वापरला जातो. यामुळे मात्र व्यवसायाचे नुकसान न होता अनेक फायदे होतात व त्याचे महत्व सुद्धा अनेक पटीने वाढते ते पुढीलप्रमाणे.

**१) नावलौकिक वाढतो:** व्यावसायिक कॉर्पोरेट सामाजिक दायित्व अंतर्गत अनेक समाजाभिमुख उपक्रम राबवित असतो. त्या उपक्रमातून अनेक लोकांपर्यंत पोहोचतो. पर्यायाने तो आपले उद्देश, उत्पादन यांचीही ओळख लोकांना करून देतो आणि त्यातून त्याच्या वस्तूला व त्याला सुद्धा प्रसिद्धी मिळते.

**२) अधिक गुंतवणूक सहज शक्य:** सीएसआर अंतर्गत अनेक उपक्रम कंपनी द्वारे राबविले जातात. त्याचा फायदा कंपनीला गुंतवणूक वाढविण्यास होतो. गुंतवणूकदारांचा विश्वास अश्या कंपनीवर अधिक असतो कारण त्या नेहमी फायद्यात असतात.

**३) कर्मचारी टिकून राहतात:** सीएसआर अंतर्गत कंपनी व्यवस्थापन मानव संसाधन विकास सुद्धा करीत असते. त्यानुसार कर्मचारी प्रशिक्षण, वेतन वाढ, बढती, सोयी - सुविधा, नोकरीची सुरक्षा व स्थिरता, व्यावसायिक आरोग्य ई. घटकांकडे अधिक लक्ष दिले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो तशेच परस्पर सहकार्याची भावना वाढते. त्यामुळे ते व्यवसाय/नोकरी सोडून जात नाही.

**४) ग्राहक अधिक प्रमाणात आकर्षित होतात:** सीएसआर धोरण अंतर्गत कंपनी नेहमी आपल्या ग्राहकांना अधिक महत्व देत असते. वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमाअंतर्गत ती ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत असते. आम्ही समाजाशी कसे जोडले आहोत हे सांगण्याचा प्रयत्न ते वेगवेगळ्या मार्गाने करीत असतात. आपले उत्पादन नेहमी उच्च प्रतीचे आणि समाजाभिमुख ठेवत असतात. त्यामुळे आपोआपच ग्राहक त्यांच्या उत्पादनाकडे आकर्षित होतात आणि त्यांची विक्री वाढते. पर्यायाने त्यांचा नफाही वाढतो.

**५) आपल्या ब्रँडची जाहिरात करण्याचा एक उत्तम व नवीन मार्ग:** आधुनिक काळात, तंत्रज्ञानामुळे नवनवीन जाहिरातीद्वारे व्यावसायिक आपली वस्तू ग्राहकांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणात त्याला खर्चही करावा लागतो. पण सीएसआर धोरण अंतर्गत व्यावसायिक आपोआपच समाजापर्यंत पोहोचतो. समाज सेवा करता करता त्याच्या उत्पादनाची सुद्धा



Scanned with CamScanner